# माझा प्रवास – जयश्री कुलकर्णी

माझं नाव जयश्री कुलकर्णी. मुंबईतच लहानाची मोठी झाले. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण झाल्यानंतर पदवी शिक्षणासाठी 'रचना संसद' या महाविद्यालयात प्रवेश घेतला. माझे पदवी शिक्षण मी वास्तुकलाशास्त्र (architecture) या विषयात घेतले. मला आठवतंय जेव्हा लहानपणी पाहुणे मंडळी घरी यायची, तेव्हा एक प्रश्न ते नक्की विचारणार, "बाळा, मोठेपणी तू काय होणारेस?" मला खरंतर हा प्रश्नच धोकादायक वाटतो. कारण या प्रश्नामागे एक अपेक्षित उत्तर नेहमीच तयार असतं - डॉक्टर, इंजिनिअर, कलेक्टर, पायलट, वैज्ञानिक किंवा तत्सम! ही उत्तरं लहान मुलांच्या आजूबाजूला ऐकलेली, वाचलेली, पाहिलेली असतात. साधारणतः ही उत्तरं पैसा, प्रतिष्ठा, सुरक्षितता किंवा सुबत्ता या निकषांवर ठरतात आणि हेच पुढे जाऊन मुलांचे भविष्य बनते.

दुसऱ्या वर्षाला असताना HUDCO स्पर्धेत मी भाग घेतला होता. त्यासाठी 'Night Shelter for Homeless' या विषयावर डिझाईन करायचं होतं. या दरम्यान आम्ही बऱ्याच साईट्स बघितल्या. मुंबईमध्ये तर बेघरांची संख्या अमाप होती. अशाच एका क्षेत्रभेटीला रात्री एकदिडच्या सुमारास साईट डॉक्युमेंटेशनसाठी कालबादेवी एरियामध्ये गेलो होतो. मेन रोडवरून एका गल्लीत शिरलो, बाजार गल्ली होती बहुतेक, अगदीच अरुंद! आणि तिथे असलेलं दृश्य पाहून अंगावर काटाच आला सर्रकन! रस्त्याच्या दोन्ही बाजूला अंधाऱ्या रात्री उघड्यावर, बोचऱ्या थंडीत अक्षरशः प्रेतं ठेवल्यासारखी एकमेकाला चिकटून माणसं झोपली होती. इंचभरही जागा नव्हती. मला क्षणात माझ्या अंगावर असलेल्या स्वेटरचं ओझं वाटू लागलं. चार भिंतीच्या सुरक्षित वातावरणाच्या पलीकडे असे काहीतरी मी पहिल्यांदा पाहत होते. थंडीत अंगावर कपडे नाही, डोक्यावर छप्पर नाही, पैशासाठी आपलं गाव, कुटुंब, आपल्या शेतजमिनी सोडून आलेले असंख्य गोरगरीब ह्या मुंबई शहरात होते, पण मलाच ते कधी दिसले नव्हते.

'झोपडपट्टी पुनर्विकास'साठी design brief करत असताना 'बेरहमपाडा'ला साईट होती. तिथलं चित्रही थक्क करणारं होतं. रस्त्यांची रुंदी म्हणजे दोन माणसं जाऊ शकतील इतकी! दोन घरांमध्ये एका हाताएवढंही अंतर नाही. घराला एक खिडकी नाही; जिथे श्वास घेता येणार नाही अशा ठिकाणी १०-१२ माणसं कोंबून भरलेली. जिथं २ मिनिटं उभं राहून गुदमरायला होईल अशा खोलीत ही माणसं आख्खं आयुष्य काढतात. एकीकडे ८ लेन, १६ लेनचे महामार्ग, उंचच उंच अपार्टमेंट्स आणि दुसरीकडे हे असं चित्र. आपल्या समाजात काही अंतरावरच असलेल्या या विरोधाभासाने काही गंभीर प्रश्न मनात निर्माण केले. माझ्या जीवनाकडे बघण्याच्या 'कल्पनां'ना जबरदस्त हादरा बसला होता.

ग्रॅज्युएशन झाल्यानंतर इंटर्नशिपसाठी कोल्हापूरला शिरीष वारी यांच्याकडे गेले होते. मुंबईत वाढली असल्यामुळे 'एक्स्पोजर' होते, हातात डिग्री होती, कामाचा पुरेसा अनुभव मिळाला होता पण

काहीतरी कमी आहे असं नेहमी वाटत राहायचं. मनात प्रश्न यायचे की मला जीवनात नक्की काय करायचंय, माझं आयुष्य मी कशाला समर्पित करू? समाजाच्या चौकटीने मला एक ओळख दिलेली आहे, त्याच्या पलीकडे 'मी' कोण आहे? आजूबाजूला इतकं काही घडत असताना मी यात कुठे बसते? पैसा कमावणं, सुरक्षित खोपा करून राहणं, आईबाबांची मान उंचावणं या सगळ्याला कुठे मर्यादा आहेत का? या प्रश्नांचं समाधान झाल्याशिवाय मी पुढे काय करणार याचं उत्तर मिळणार नव्हतं. शिरीष काकांनी तेव्हा मला 'निर्माण'बद्दल सांगितलं. काही दिवसांनी डॉ. अभय बंग स्वतः रुईया कॉलेजला भाषणासाठी येणार होते. त्यांचं 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' हे पुस्तकही त्याच काळात वाचलेलं. या सगळ्या सोर्सेसमधून निर्माण प्रक्रिया कळत गेली आणि माझ्या जीवनाचा शोध घेत घेत मी अखेर 'निर्माण'ला आले.

'निर्माण' शिबिरामध्ये बऱ्याच प्रश्नांची उकल झाली, काही नव्याने प्रश्न पडले. जीवनात मूल्य का असावीत, जीवनशैलीत आणखी साधेपणा कसा आणता येईल, सामाजिक प्रश्न सोडवण्याचे निरनिराळ्या पद्धती कुठल्या, वेगवेगळ्या लोकांनी काय केलं, अशा प्रश्नांसोबतच सामाजिक समस्यांची कारणीमिमांसा आणि गोष्टींकडे एका व्यापक दृष्टीतून बघू लागले. 'स्व'च्या पलीकडल्या जगातील समस्यांवर मी काम करू शकेन हा आत्मविश्वास कमवला, स्वतःच्या असुरक्षितता बाजूला ठेऊन इतरांच्या जगण्यामरण्याचा विचार करू लागले.

'निर्माण' शिबिरातून गेल्यानंतर मला 'वयम्' या संस्थेविषयी माहिती मिळाली. 'पुढे काय काम करू?' हा प्रश्न दत्त बनून पुढे उभाच होता. म्हणून पुढील एक वर्ष मी 'वयम्' संस्थेसोबत काम करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी 'निर्माण'ने मला फेलोशिपही दिली – 'कर के देखो' फेलोशिप! हा एक वर्षाचा प्रवास मला जीवनात कलाटणी देणारा वाटतो कारण मी प्रत्यक्ष जीवनाशी भिडत होते. काम करताना बरेच अनुभव यायचे, त्यातून मी खूप काही शिकले.

असाच एक अनुभव म्हणजे जव्हारमधील अतिदुर्गम 'खरपडपाडा' गावातील ग्रामसभा. ग्रामसभेसाठी जायचे होते. गावाला जायचा रस्ता कच्चा आणि मोठमोठे खड्डे असणारा होता. जाताना मध्ये एक नदी ओलांडून जावे लागते. आम्ही डोंगर उतरलो, नदीकिनारी पोहोचलो तेव्हा गणपतदादा आमची वाटच पाहत होते. तिथेच नदी पार करण्यासाठी उघड्यावर कपडे बदलले. नदीला जोर होता. गणपतदादाने दोन जाडजूड काठ्या बरोबर आणल्या होत्या. एक काठी एकमेकांच्या आधाराला आणि एक काठी पाण्यात स्वतःचा तोल सांभाळायला. मध्यापर्यंत आलो तेव्हा मी पाण्यात डोकं घालून डुबकी दिली. वर पाहिलं तर चारही बाजूने गर्द डोंगर, वर 'अंबर की गेहेरी खाई'!

एकमेकांना धरत धरत काठापर्यंत पोहोचलो. कपडे बदलले आणि पुन्हा गावात जाण्यासाठी डोंगर चढायला लागलो. गाव अगदीच लहान १६ घरांचं. सगळेजण जमेपर्यंत गाव फिरत बसलो. गणपतदादाच्या घरीच ग्रामसभा होणार होती. गावातील म्हातारी, लहान, तरुण अशी सर्व मंडळी

जमली. एकमेकांना धरून अजिबात आवाजाची चढाओढ न करता सगळेजण शांतपणे आपली मतं मांडत होती. सगळंच अगदी सुसंगत आणि व्यवस्थित. सभा झाल्यावर प्रोसिडींग लिहिली. सगळेजण ग्रामसभा होईपर्यंत थांबले होते. ग्रामसभा झाल्यावर लगेच ग्रामसभा कार्यालयाचा बॅनर लावायला घेतला. त्यात दुमत झालं पण लगेचच तिढा सुटला. इतकी चटपटी वृत्ती, कामाबद्दल, गावाबद्दल आस्था मी यापूर्वी कुठल्याच गावामध्ये पाहिली नव्हती. लोकांवर कसलीच अनैसर्गिकतेची झालर नव्हती. ग्रामसभा कार्यालयाचा बॅनर लावायच्या वेळेस मी त्यांच्याच बरोबर थांबले होते. 'लोकशाही', 'चळवळ', 'स्वशासन' हे शब्द आत्तापर्यंत फक्त वाचलेले, ऐकलेले होते. पण त्यांचा सार त्यादिवशी, त्याक्षणी अनुभवला. माझ्यातला 'मी' गळत चाललाय असे जाणवले. मी 'आत्मकेंद्री' का नसावं हे 'आत्मकेंद्री' नसल्याशिवाय कळत नाही. 'गाव' म्हणून एकत्र काम करण्याची प्रेरणा आणि चळवळीची ऊर्जा हे त्या दिवशीच्या 'खरपडपाडा' ग्रामसभेत ठसठसून दिसत होत. मी त्यांचाच एक भाग बनले होते. माझ्यासाठी तो दिवस अनेक अर्थांनी क्रांतिकारी होता.

एक दिवस 'डोयापाडा' या विक्रमगड तालुक्यातल्या गावामध्ये शहरातली काही तरुण गावाचं जंगल व्यवस्थापन, गावाचं नेतृत्व पाहायला अभ्यास दौऱ्यावर आली होती. कृष्णादादा गावाच्या संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष होते. जंगल फिरत असतांना त्यांना ओहोळ लागला. त्यात मुडा (मासे पकडण्यासाठी ठेवलेला सापळा) होता. कृष्णादादा सांगत होता, "या मुडयात मासे अडकतात. रात्रभर ठेवला की दुसऱ्या दिवशी मासे घेऊन जायचे". तरुण मंडळींनी विचारलं, "अरे मग रात्री कोणी चोरले तर मासे?" हे ऐकून कृष्णादादाला हसूच फुटलं. तो म्हणाला "कोणी कशाला चोरेल? आणि कोणी घेतलेच तर जेवढे लागतील तेवढेच घेऊन जाईल". गरजेपेक्षा जास्त घेऊ नये हे कुठल्या पुस्तकातून ही माणसं शिकली असतील? याचं उत्तर कुठल्या पुस्तकात नसून निसर्गातच आहे. हे लोक निसर्गाशी इतके एकरूप आहेत की स्वतःचीच काय चोरी करायची? असा विचार करत असतील. त्यादिवशी कोणीतरी गालफडात मारल्यासारखं वाटलं.

मुलांच्या शिक्षणासाठी नवीन पद्धत वापरावी म्हणून 'बिन बुका, या शिका' हा उपक्रम सुरु झाला. त्याचे एक केंद्र आम्ही 'धिडपाड्या'तल्या मुलांसाठी सुरु केले. तिथल्या मुलांचं आणि माझं नातं अत्यंत खेळीमेळीचं. 'बिन बुका, या शिका'चं स्वरूपसुद्धा बऱ्याच अंशी अनौपचारिकच होते. ७ महिने हे केंद्र चाललं; नंतर मुलं अनियमित व्हायला लागली. कंटाळा करायला लागली आणि एक दिवस मुलांनीच स्वतःहून सांगितलं, "ताई आपण थांबूया". मला प्रचंड वाईट वाटलं, खूप त्रास झाला. पण त्यानंतर मी या झालेल्या घटनेकडे 'माझ्या' वाटण्यापलीकडे जाऊन तटस्थपणे पाहू लागले. याच्या मागची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला आणि काही प्रश्न मीच स्वतःला विचारले:

"या उपक्रमाची गरज काय? मुलांना त्याची गरज वाटते का? मुलांची गरज मी कशी ओळखावी? त्यांना कशा प्रकारचं शिक्षण द्यावं? मला त्यांच्यापर्यंत कसं पोहोचता येईल? मुलं एखादी गोष्ट कशी शिकतात? शिक्षण म्हणजे काय? ते कसं घडत? मी मुलांच्या भूमिकेतून पाहू शकते का?"

या सर्व प्रश्नांचा शोध मी सध्या घेत आहे. कारण या सगळ्यात माझी नेमकी काय भूमिका असावी, हे स्पष्ट होणं मला सध्या गरजेचं वाटू लागलंय.

कौशल्य तर असेल, आवाहनात्मकही वाटत असेल, प्रतिष्ठां असेल पण या सगळ्याबरोबरच किंवा किंचित पलीकडे जाऊन मला एखादा प्रश्न ‘माझा प्रश्न’ वाटतोय का? हे माझं काम वाटतंय का? एकदा ‘माझं’ म्हंटलं की त्या प्रश्नाची जबाबदरी येते. आपण त्या कामाला कोणत्याही दडपणाखाली न जाता स्वीकारतो. मला वाटते आपल्या प्रत्येकालाच आत काही तरी खोल असं वाटत असावं. स्वतःत इतकं खोल जाण्याची संधी मी यापूर्वी स्वतःला कधीच दिली नव्हती. आयुष्याच्या व्यावहारिक तपशिलांमध्ये स्वतःच्या ‘छद्म – स्वस्थ’ स्थितीमध्ये अडकवून घेत होते.

माझे प्रश्न हे बाहेरील नसून मला खोलवर पडलेले प्रश्न आहेत आणि केवळ त्याच प्रश्नांच्या मी शोधात आहे. वर नमूद केलेल्या व न केलेल्या सर्व घटनांनी आणि व्यक्तींनी मिळून मी बनलेली आहे - मग ते ‘निर्माण’ असो, ‘वयम्’ असो, कोल्हापूर असो की मुंबई असो. या सर्वांचाच मी एक भाग बनू पाहत होते आणि आता हे सगळंच माझा एक भाग आहे.

**- जयश्री कुलकर्णी**